Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# श्री बसवेश्वर या समाज सुधारकांचे कार्य

अमृता दिलीप दत्तू

बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा

***सारांश*** :

इ.स.१२ वे शतक हे महाराष्ट्राच्या नव्हेतर भारताच्या इतिहासात अनेक दृष्टीने महत्त्वाचे होते. कारण भक्ती आंदोलनाच्यादृष्टीने हे शतक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे हे शतक अनेक स्थित्यंतराचे प्रतीक असल्याचे दिसते. बसव धर्म हा फक्त लिंगायत धर्मियांच्या पुरताच सीमीत नसून संपुर्ण मानव जातीच्या कल्याणाकरिता उभारलेले ते क्रांतीकारी आंदोलन होते. बाराव्या शतकात समाजातील टोकाच्या विषयम परिस्थितीचा नाश करुन समाजात समानता प्रस्थापित करण्याकरिता बसवेश्वरांच्या नेतृत्वात शरण - शरणींनी प्राणपणास लावलेल्या या कार्यासाठी त्यांनी केलेले जनपर आंदोलन फक्त कर्नाटकाच्या नव्हे, तर संपुर्ण देशाच्या इतिहासातील एक वैशिष्टयपुर्ण घटना होय. म. बसवेश्वरांनी समाजातील सर्वच क्षेत्रात अर्थात नैतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यीक, अध्यात्मिक अशा सर्वच क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. १२ व्या शतकातील त्यांचे क्रांतीकारी विचार आजच्या २१ व्या शतकातही प्रासंगिक असल्याचे दिसतात.

***प्रस्तावना :***

महाराष्ट्र शासनाने २००३ मध्ये म. बसवेश्वरांची जयंती शासनामार्फत साजरी करण्याबाबत आदेश काढला. या कारणे सर्वांचीच जिज्ञासा जागृत झाली आहे. बसवेश्वरांची तत्वे व त्यांचे जीवन चरित्र जाणण्याकरिता त्यांच्या साहित्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. बसवपुर्व काळात कर्नाटकाची सामान्य जनता राजसत्ता, धर्मसत्ता आणि पुरुष सत्तेच्या कचाटयात सापडली होती. दुर्बल जनांचे शोषण करत उच्च वर्गातील लोक आपले ऐषआरामी जीवन जगत होते. या समाजासाठी बसवेश्वरांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

**उद्दिष्टये :-**

१) महात्मा बसवेश्वर चे सामाजिक कार्य जाणून घेणे.
२) महात्मा बसवेश्वर व मंगळवेढा आलेला संबंध स्पष्ट करणे.
३) महात्मा बसवेश्वर यांची धार्मिक संकल्पना जाणून घेणे व त्यावर प्रकाश टाकणे.

**बसवेश्वरांच जनन :-**

श्रीशिवाच्या नंदीचा अवतार असलेल्या श्री बसवेश्वरांचा (भक्ती भंडारी, बसव, बसवन्ना) जन्म शके १०५३, वैशाख शुध्द ।।३।। (इ.स.११३१) ला पिता मदिराज व माता मादलांबिका या शैव ब्राम्हण दांपत्यांच्या उदरी बागेवाडी (कर्नाटक, जि. विजापूर) येथे झाला. त्यांना 'देवराज मुनी' हा भाऊ व 'अक्कनागम्मा' ही बहीण होती. बालपणी उपनयन करण्यास नकार देऊन त्यांनी कुडलसंगम (कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमावर, जि. विजापूर) येथे संगमनाथाच्या आश्रयास येऊन जातवेद शिवाचार्याकडून विरशैव धर्माची 'इष्टलिंगदिक्षा' घेतली. नंतर ते मंगळवेढयास (जि. सोलापूर, महाराष्ट्र) बिज्जल महामंडळेश्वराकडे आले व धर्मशास्त्राचे अध्ययन केले. तेथुन ते 'बसव कल्यान' (जि. बिदर, कर्नाटक) येथे कलकुरीवंशाच्या बिज्जल राजाकडे कारकून म्हणून काम करु लागले. तिथे त्यांचा मामा 'बलदेव' मंत्री होता. त्यांच्या 'गंगाबिका' या मुलीशी श्रीबसवेश्वरांचा विवाह झाला. बलदेवाच्या मृत्युनंतर श्री बसवेश्वर बिज्जल राजाकडे कोषागाराचे प्रमुख झाले. कृष्णेला महापूर आला असता बसवेश्वरांना पाण्यातुन वाट मिळाली व बिज्जल राजाला गुप्तधन सापडून दिले. त्यांची विद्धत्ता व अध्यात्मिक आधिकारामुळे अनेक जातीधर्मांचे लोक त्यांचे शिष्य झाले. पहिल्या पत्नीच्या मृत्युनंतर त्यांचा विवाह 'निलांबिका' हीच्याशी झाला. श्री बसवेश्वरांना 'बालसंगय्य' हा मुलगा होता. त्यांनी बसव कल्याणला 'शिवानुभवपटंप'(अनुभवमंटप) ही संस्था स्थापन केली. तेथे विदवान लोकांच्या चर्चेत स्त्रियाही भाग घेत. अककममहादेवी, सत्यक्का व नागम्मा या साध्वी महिला याचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांनी कायकये कैलास (शरीरश्रम स्वर्ग व व्यवसाय हा कैलास आहेत) हा सिध्दांत मांडला. समाजातील भेद नाहीसे करण्यासाठी ते 'ककैय' या ढोर जातीच्या शिष्याकडे जेवण घेतले. व मधुवय्या या ब्राह्मण शिष्याची मुलगी व हरळप्पा चांभार शिष्याचा मुलगा यांचा विवाहास मान्यता दिली. त्यामुळे त्यांना राजा बिज्जल व सनातनी लोकांनी त्यांना त्रास दिला. सनातन्यांच्या अत्याचाराला कंटाळून ते कुडसंगमक्षेत्री गेले व तेथे इ.स. ११६८, श्रावण शु. ।।१।। ला शिवरुप झाले. त्यांनी आपले विचार मुक्तछांदातील काव्याप्रमाणे कन्नड भाषेत सांगून सर्व जातीपंथांना लिंगपुजेचा अधिकार दिला. "ॐ नमः शिवाय।" मंत्राचा जप करुन कपाळावर भस्म व आडवे गंध लावून रुद्राक्ष माळा व शिवलिंग धारण करणाऱ्या शिवभक्तांना 'शैवसंप्रदायी' म्हणतात. 'शिव-शक्तीची' पुजा करणाऱ्या पुरोहितांना 'जंगम' म्हणतात. ब्रम्हचारी जंगत उपदेश करतात व गृहस्थी जंगम शैवाचे विवाहादी विधी करतात. मुंबई जवळ धारापुरीच्या (एलिफंटा) ५ लेण्या शैवपंथांच्या आहेत. या पंथात आदय श्री शंकराचार्यांच्या १. पदयपाद (तीर्थ, आश्रम), २. हस्तामलक (वण, अरण्य), ३. सुरेश्वर (सरस्वती, पुरी, भारती), ४. त्रोटक (गिरी, पर्वत, सागर) या शिष्यांच्या नावावरुन निर्माण झालेल्या पंथास 'दशनामी' पंथ म्हणतात. त्यांच्यातील पात्रतेनुसार कुटीचक्र, बहुरक, हंस व परमहंस हे चार भेद आहेत. यातील पहिल्या दोघांना त्रिदंडी म्हणतात. दशनामी गोसाव्यांच्या मठांना आखाडे म्हणतात. निरंजनी, निर्वानी, अटल, सनातनी, वाजुना, अग्नी, अभान व आनंद हे आखाडे आहेत. हे काशी, प्रयाग, हरीद्धार व झारखंड इत्यादी ठिकाणी आहेत. सन्याशी एकदा जेवण, गावाबाहेर राहणे, जमीनीवर झोपणे व फक्त ७ घरी भिक्षा मागतात. गुरुसेवक वस्त्रधारी १० ते १२ वर्षानंतर नंगा वा नागा साधु होतो.

**बसवेश्वरांचे मंगळवेढयातील कार्य :-**

शालीवाहन शकाच्या सात ते आठ शतकाच्या प्रारंभी कल्याण कलचुरी घराण्याचा राजा ब्रिजल याने मंगळवेढा नगरीवर बरीच वर्षे राज्य केले. त्यावेळी मंगळवेढा परगाना हा बिज्जल राजाच्या अधिपत्याखाली होता. त्याच्या राजवटीत मंगळवेढा ही राजधानी होती. ब्रिजल हा अतिशय हुषार राजकारणी धुरंधर होता. त्याने आपल्या राज्याच्या दक्षिणोत्तर विस्तार केला. ब्रिजळ राजाचा प्रधान बसवेश्वर हा अति चाक्षाण, हुषार होता. तो वेदशास्त्रात, धर्नुविदयेत व अनेक कलेत पारंगत होता. गोरगरीब जनतेच्या सुख दुःखासाठी रात्रंदिन सतर्क राहत असे. त्याच्या कारकीर्दीत मंगळवेढयात बरीच शिवमंदिरे बांधली असावीत. जवळच रेवणसिध्देश्वराचे अती जुनाट भुयारी मंदिराचा जिर्णोध्दार बसवेश्वरांनी केला असावा. बसवेश्वर हे परम

शिवभक्त होते. सध्या कैकाडी बावी शेजारील जटा शंकर मंदिर त्यांच्याच कारकिर्दीत झाले असावे. तेथे अतिउंच असा टेहकनी बुरुज होता. त्यावेळी मंगळवेढयात अतिशय देखणी व सुंदर अशी बारा ज्योर्तिलिंग मंडीत महादेवाची पिंड होती. बसवेश्वरांनी जीर्णोध्दार करुन ती पिंड कोणी स्थापन केली, त्याच्या पुर्वइतिहासावरुन तिचे रामलिंग असे नामाभिदान करण्यात आले. मंगळवेढयाच्या थोडयाच अंतरावर माळावर एकविरादेवीचे जुनाट मंदिर आहे. त्याचाही जिर्णोध्दार बसवेश्वरांनी केला असावा. राजा ब्रिजलने ३१ वर्षे राज्य या मंगळवेढया परगण्यावर केले. बसवेश्वर हे लिंगायत आदयप्रवर्तक होते. त्यसांनी मंगळवेढयातुनच लिंगायत धर्माची स्थापना करुन मुहूर्त मेढ रोवली. ३१ वर्षे ते इथेच प्रधानपद भुषवुन धर्मप्रचारार्थ त्यांनी श्रवणबेळगाव, बसवकल्याण इत्यादी कर्नाटक प्रातांत लिंगायत धर्माची विजयी धर्म पताका फडकावली. बसवेश्वरांनी विरशैव होण्यापूर्वी ब्राह्मण असलेल्या मधुवारसांची मुलगी आणि अस्पृश्य मानले गेलेल्या हरळयाचा मुलगा यांचा विवाह लावून दिला. ही त्यांच्या धार्मिक कार्याची परिणीतीच होय. असा या ‘सुवर्ण पटात’ उल्लेख आहे. हे एकुण राजा अत्यंत खुष झाला. बसवेश्वराच्या सल्ल्याप्रमाणे सिंहासनाखाली खोदण्यात आले. तेथे पुरलेली अपार संपत्ती लाभल्या कारणे राजाचा आनंद गगनात मावेना. राजा आपल्या गाळयातील रत्नहार काढून बसवण्णाना देऊ लागला. तेंव्हा बसवण्णा म्हणाले, “क्षमा करा महाराज ! मी माझे कर्तव्य केले आहे. याकरीता बक्षिस का?” हे ऐकुन राजा म्हणला, मग या संपत्तीतील काही भाग घ्यायला काय हरकत आहे ? बसवण्णा म्हणाले, “मी कायक करुन आलेल्या पैशांनीच माझा संसार चालवतो. “कायक हाच कैलास” हे माझे तत्व आहे”. हे ऐकुण बिज्जक राजा अत्यंत खुष झाला. त्याने बसवेश्वरांना आलिंगन दिले आणि म्हणाला, “बसवराजा मी तुमच्यावर एक मोठी जबाबदारी सोपवणार आहे. कारण राज्यभांडार तुमच्यासारख्या सत्यनिष्ठांच्या, तत्वोपासकाच्या हाती सुरक्षित राहील”.

**बसव धर्म :-**

बसवेश्वरांचा धर्म हा उच्च कुळातील धर्म नव्हे; तर समाजातील तळागाळातील लोकांचा धर्म होय ! स्थावर देवलयाचा धर्म नव्हे; दुःखीतांचा धर्म! पुजारी पुरोहिताचा धर्म नव्हे तर कायकजीवी म्हणजे श्रम करणाऱ्यांचा धर्म! शोषन करणाऱ्यांचा धर्म नव्हे; सत्यवादयांचा धर्म! पंडितांचा धर्म नव्हे; पतितांचा पावन करणारा धर्म! त्यांनी सांगितलेले मुख्य तत्व ‘अंतरंग शुध्दी, बहीरंग शुध्दी’ बोलल्याप्रमाणे वागावे, चालावे या उक्तीला त्यांचे जीवनच उदाहरण होते. त्यांनी सामाजिक असमानता नष्ट करुन सर्वांना समान अधिकार दिला. समाजातील आंधश्रध्दा, अनाचारांचा नाश करुन ‘सदाचारच स्वर्ग - अनाचारच नरक’ असे सांगून या जगीच स्वर्ग नरक आहे असे सांगितले, मेल्यावर मुक्ती लाभते या भ्रमाचा नाश केला. बसवेश्वर सकल जीवात्म्याचे भले चिंतणारे महामानव, स्वतंत्र विचारवादी होते.

**लिंगायत धर्माचे जनक बसवेश्वर :-**

बसवेश्वर हेच लिंगायत धर्माचे जनक आहेत. जसे येशु ख्रिस्त ख्रिश्चन धर्माचे जनक, भगवान बुध्द बौध्द धर्माचे जनक आहेत, त्याप्रमाणे लिंगायत धर्माचे संस्थापक बसवेश्वर होत. धर्माच्या मुळ पुरुषाचे नावच मंत्र बनतो. या कारणे “ॐ श्री गुरु बसवलींगाय नमः” हा मंत्र रुद्र झालेला आहे. जुन्या ताडपत्रांपासून आधुनिक ग्रंथापर्यंत हाच मंत्र प्रचारात आहे. विसाव्या शतकातील अनेक श्रेष्ठ साहित्यीकांनी बसवेश्वरच धर्मसंस्थापक आहेत असे आपल्याला ग्रंथात प्रतिपादन केले आहे. शिवाय लोकगीत साहित्यातही असेच दिसुन येते. प्राचीन कन्नड साहित्यातील श्रेष्ठ कवींनी म्हणजेच हरीहर, चामरस, पल्कुरीके सोमनाथ, भीमकवी, पाडदार देव आदींनी धर्मगुरु बसवेश्वरच होत असे नमुद केले आहे. नंतरचे येडेयुर सिध्दलींगेश्वर, षण्मुख शिवयोगी आदी शिवयोगींनी बसवेश्वर धर्मगुरु आहेत असे आपल्या वचनातुन स्पष्ट केले आहे.

**निष्कर्ष :-**

बसवेश्वरांनी समाजातील अनिष्ठ प्रथांना विरोध केला. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह करण्यास जातीप्रथा मोडण्यास यांनी प्रोत्साहन दिले. समाजातील अन्याय व अत्याचार यास विरोध करण्याचा प्रयत्न केला. लिंगायत धर्माची स्थापना बसवेश्वरांनी स्थापना केली. त्यांना लिंगायत धर्माचे आद्यप्रवर्तक म्हंटले जाते. बिज्जल राज्याच्या कारकिर्दीत मंगळवेढयात बसवेश्वरांनी बरीच शिवमंदिरे बांधली असावीत. मंगळवेढयात रेवणसिध्दचे प्राचीन भुयारी मंदिराचा जीर्णोध्दार केला. बसवेश्वर हे परम शिवभक्त होते. सध्या कैकाडी बावी शेजारील जटा शंकर मंदीर त्यांच्याच कारकीर्दीत बांधले गेले असावे. बसवेश्वरांनी कर्नाटकमध्ये तसेच महाराष्ट्र व इतर राज्यामध्ये समाज सुधारणेचे कार्य केले. जगवंध्य बसवेश्वरांची समाधी कृष्णा, मलप्रभा व घटप्रभा या नदयांच्या संगमावर आहे. सध्या तेथे धरण बांधल्यामुळे जो जलाशय निर्माण झाला त्यास ‘बसवसागर’ जलाशय असे म्हणतात.

**संदर्भग्रंथ :-**

१) आपली संस्कृती - समाजसुधारक महामंत्री महात्मा बसवेश्वर (चरित्र)
मंगळवेढा भुमी संतांची (मंगळवेढा साप्ताहिक) इ. पुस्तकातून माहिती जमा केली.

२) गोपाळ देशमुख, सोलापूरचा जिल्हयाचा इतिहास (मराठा कालखंड) भाग १, रेवू प्रकाशन, पंढरपूर, २००९.

३) कामत अशोक, महात्मा बसवेश्वर सत्संग प्रतिष्ठान, पुणे, १९९९.

४) मेनकुंदळे अशोक, बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००३.

५) घुगरे सुर्यकांत, विरशैव व इतर धर्म व समाज साधना प्रकाशन, गडहिंग्लज, १९९९.

६) ढेरे.रा.चि, सकल संतगाथा, खंड ५, वरदा प्रकाशन, पुणे, १९८३.

७) डॉ.सुधाकर सोमेश्वर मोगलेवार, मंगळवेढा - मंगळवेढयाचा क्रांतीसूर्य शिवयोगी बसवण्णा, प्रथम आवृत्ती, २००५.

८) Maharashtra State Gazatter Solapur District, 1989.



**महात्मा बसवेश्वर यांची चंद्रपूर येथील गोंद समाधी**



**महात्मा बसवेश्वर यांचा आधुनिक बांधकाम केलेला सभामंडप**



महात्मा बसवेश्वर यांनी जिर्णोध्दार केले श्री. रेवणसिध्देश्वर मंदिर, मंगळवेढा



अमृता दिलीप दत्तू
बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा